DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY AURANGABAD

# Chhatrapati Shivaji Maharaj Study Centre

NAAC Accredited B+

**Ref.No.BAMU/CSMSC/2009/** Date: 29-10-2009

## २००८-०९ वर्षाचा शैक्षणिक प्रगतीचा अहवाल

**प्रति,**
**मा.संचालक,**
**विद्यार्थी कल्याण विकास मंडळ**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे सन २००८-२००९ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. हे कार्यक्रम घेण्यापाठीमागे शिवाजी महाराज व एकंदरीतच मराठा इतिहासाच्या बाबतीत नवनवीन संशोधन करणे व नवे संशोधन समोर आनणे हा उद्देश आहे.

दि.२७ जानेवारी २००९ ते १९ फेब्रुवारी २००९ या काळात मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी पुणे विद्यापीठातील निवृत्त मोडी तज्ज्ञ डॉ.एम.आर.कुलकर्णी यांना आमंत्रित केले होते. ८९ विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

इतिहास लेखनासाठी त्या-त्या काळातील वापरलेल्या वस्तू, शस्त्रे हे उपयोगी असतात त्या काळातील लढाया व लढाईचे तंत्र कसे होते याचा अंदाज आपणास येतो . मध्ययुगीन काळाच्या इतिहास लेखनामध्ये मध्ययुगीन काळातील शस्त्रे महत्त्वाची ठरतात त्यासाठी दि. १३ ते १६ फेब्रुवारी २००९ रोजी 'इतिहासाचे साक्षीदार' हे शस्त्र प्रदर्शन विद्यार्थी कल्याण विभागाच्या सहाय्याने घेण्यात आले. या प्रदर्शनात, भाले, पट्टा, दांड पट्टा, तलवारी, राज्यस्थानी तलवार, फिरंगी तलवार, कुऱ्हाडी, कुलुप, ढाल, वाघनखे, चिलखत, तीर कांमटा, हरणाची शिंग, कट्यार, तोफगोळे, खंजिर इत्यादी शस्त्रास्त्रे ठेवली होती. या शस्त्रांचे संग्राहक गिरीश जाधव व त्यांचे सहकारी पवनकुमार निप्पणिकर यांनी सतत चार दिवस मार्गदर्शन केले. या प्रदर्शनाचा लाभ सुमारे २००० विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक व इतिहास प्रेमींनी घेतला.

दि. १९ फेब्रुवारी २००९ रोजी डॉ.अब्दुल गनी इमारतवाले, विजापूर यांचे शिवजयंती निमित्त 'शहाजी राजे, शिवाजी राजे आणि मराठा राज्याची स्थापना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले या कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.ए.जी.खान (प्रभारी कुलगुरु) होते.

दि. २०,२१ फेब्रुवारी २००९ रोजी Rewriting History of Chhatrapati. Shivaji या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन सकाळी ११ वाजता सुप्रसिद्ध इतिहास तज्ज्ञ डॉ.जयसिंगराव पवार (कोल्हापूर) यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक मुळे (कुलसचिव) उपस्थित होते व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. ए.जी. खान (प्रभारी कुलगुरु) यांनी भुषविले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना डॉ.जयसिंगराव पवार म्हणाले की, ''आजपर्यंत लिहिला गेलेला इतिहास हा उपलब्ध साधनांच्या आधारे लिहीला गेला. पण इतिहास लेखन

प्रवाहामध्ये नवनविन साधने, पुरावे मिळत जातात व त्यावरुन इतिहास नव्याने समोर येतो आणि कुठलाही इतिहासकार असा दावा करु शकत नाही की मी केलेले इतिहास लेखन हे अंतिम आहे. त्यामुळे शिवशाहीच्या इतिहासाची पुनर्मांडणी करणे आवयक आहे.''

दुपारचे सत्र इतिहास वस्तुसंग्रहालयामध्ये आयोजित करण्यात आले. यामध्ये पहिल्या सत्राचा विषय- शिवशाही व संस्कृत साधने होता. या सत्राचे अध्यक्ष डॉ.सदाशिव शिवदे होते. वृषाली भोसले यांनी 'शिवभारत्‌मचे ऐतिहासिक महत्त्व' या निबंधाचे वाचन केले तर डॉ. शिवदे यांनी संस्कृत साधनातून शिवशाहीचा सामाजिक इतिहास या विषयावर निबंध वाचन करुन संस्कृत साधनांचे शिवशाहीच्या इतिहास लेखनांच्या पुनर्मांडणीतील महत्त्व स्पष्ट केले.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात 'शिवशाही व साधने' या विषयी चर्चा करण्यात आली. डॉ.प्रल्हाद लुलेकर हे या सत्राचे अध्यक्ष होते. डॉ. अब्दुल गनी इमारतवाले यांनी Maratha History in Medieval and early Modern Persian Sources. या विषयावर शोध निबंधाचे वाचन केले. डॉ. आर.एच.किल्लेदार यांनी History of Shivaji in bosateenus Salateen. या निबंधाचे वाचन केले. प्रा. लहू गायकवाड यांनी पुणे येथील अभिलेखागारामध्ये अनेक प्रकारची कागदपत्रे कुठे-कुठे उपलब्ध आहेत याचे स्मरण करुन दिले.

तिसऱ्या सत्रात एम.एन.जोशी यांनी शिवाजीची सैन्यसंख्या १६५९-६० व त्याचे महत्त्व सांगणारा शोधनिबंध सादर केला. डॉ. उमेश कदम यांनी History of the Marathas the French Connection. या शोधनिबंधाचे वाचन केले. यामध्ये त्यांनी प्रतिपादन केली की, इंग्रजाआधी फ्रेंचानी भारतावर किंवा जगावर साम्राज्य स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले होते.

दि.२१-२-२००९ रोजी चौथे सत्र शिवशाही व परकिय या विषयावर प्रा. भाऊसाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाले. प्रा. डॉ. अशोक राजेशिर्के यांनी Portuguese-Shivaji relations 1647-1680 या विषयावर तर नीता खांडपेकर यांनी Shivaji's Relations with English and Dutch in Konkan या विषयावर आणि नीलांबरी जगताप यांनी Rajapur the changing four tunes of a part town. या विषयावर शोधनिबंध सादर केले.

पाचवे सत्र 'शिवशाहीच्या इतिहासाची पुनर्मांडणी' हे होते. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ.रामकृष्ण सोळुंके होते. या विषयावर श्रीमंत कोकाटे यांनी विस्तृत विवेचन केले. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त इयत्ता चौथीच्या पुस्तकातील शिवरायांच्या विषयी असलेल्या लेखनावरील आक्षेपांची मांडणी केली आणि शिवरायांच्या इतिहासाचे पुनर्लेखन करणे आवश्यक आहे असे मत मांडले.

सहावे सत्र शिवशाही व भूगोल हे होते. तर सातव्या सत्राची सुरवात डॉ.उमेश बगाडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. शिवशाही व सामाजिक परिस्थिती या विषयावर. सौ.पुष्पा गायकवाड आंबेडकरवादी इतिहास लिखाणाच्या दृष्टीकोनातून शेजवलकरांच्या शिवशाही विषयक लिखाणाची चिकित्साम डॉ. अनिल शिंगारे, डॉ.सोपान शेंडे, शेख मुसाक, उमाकांत सुर्यवंशी यांनी शोध निबंधाचे वाचन केले.

या राष्ट्रीय चर्चासत्रात एकूण २६ शोध निबंध सादर झाले तर ९० इतिहास संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक या चर्चासत्रास उपस्थित होते. या दोन दिवसीय चर्चासत्राचा समारोप डॉ. उमेश बगाडे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे डॉ.अशोक चव्हाण (मा. परिक्षा नियंत्रक) आणि छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे संचालक डॉ.नीरज साळुंखे यांच्या उपस्थितीत पार पडला.

**(डॉ.साळुंखे एन.ए.)**
**संचालक**
छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र

Ph.No. 0240-2403354(O), 9422878112 (M), E-mail:- salunkhe@indiatimes.com, Fax: 0240-2403335.